# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
## जनसंपर्क विभाग

कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com


===========================================================

जावक क्रमांक – ६८५/ २२ दिनांक :- १४ फेब्रुवारी, २०२५

प्रसिद्धिपत्रक

**'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री. संजीव जयस्वाल यांनी केला म्हाडा उपकरप्राप्त इमारतींचा 'मॅरेथॉन' पाहणी दौरा**

मुंबई, दि. १४ फेब्रुवारी, २०२५ :- म्हाडा मुंबई इमारत व दुरुस्ती पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीतील उपकरप्राप्त, पुनर्रचित इमारती व समूह पुनर्विकास प्रकल्पांचा 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी आज प्रत्यक्ष भेट देऊन 'मॅरेथॉन' पाहणी दौरा केला.

सकाळी ११ वाजता सुरू झालेल्या या दौऱ्याचा समारोप सायंकाळी ०५.३० वाजता झाला. या भेटीत प्रारंभी मंडळाच्या ग उत्तर विभागातील कलम ९१ अ अंतर्गत भूसंपादित केलेल्या जसोदा को- ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, स्वामी समर्थ, आर के बिल्डिंग या इमारतींची श्री. जयस्वाल यांनी पाहणी केली. या पाहणीदरम्यान येथील भाडेकरू/रहिवासी यांच्याशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. श्री. जयस्वाल यांनी या इमारतींचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित अधिकार्यांसना दिले.

आनंदालय या उपकरप्राप्त इमारतीचा पुनर्विकास रखडला असून या इमारतीच्या विकासकाला कलम ९१ अ अंतर्गत ६ महिने मुदतवाढ देण्यात आली आहे. मात्र, म्हाडाचे उपाध्यक्ष श्री. संजीव जयस्वाल यांनी दिलेल्या आजच्या भेटीत सदर इमारतीच्या रखडलेल्या पुनर्विकासाचे काम मुदतवाढ देऊनही पुन्हा थांबल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. याबाबत संबंधित विकासकावर तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश श्री. जयस्वाल यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

विकास नियंत्रण नियमावली ३३(९) अंतर्गत समूह पुनर्विकास करण्यात येणाऱ्या छपरा, मोहसीन, कुलश्री सीता स्मृती, गणेश, सौदामिनी, मेघ, वरूण, रामभुवन, आकांक्षा, गुरुकृपा, अब्दुल रेहमान, खांडके या १२ उपकरप्राप्त व पुनर्रचित इमारतींना श्री. जयस्वाल यांनी भेट देऊन पाहणी केली. या इमारतींच्या समूह पुनर्विकासासंदर्भात बैठक आयोजित करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना श्री. जयस्वाल यांनी दिले. या इमारतीतील भाडेकरु/रहिवाशांशी संवाद साधत समूह पुनर्विकासासाठी इमारतीतील रहिवाशांनी पुढे आले पाहिजे, असे आवाहन देखील श्री. जयस्वाल यांनी केले.

शंकर घाणेकर मार्गावरील बैठी चाळ व जनार्दन अपार्टमेंट या खाजगी मालमत्तेचा विकास नियंत्रण नियमावली ३३(९) अंतर्गत समूह पुनर्विकास योजनेत समावेश करण्याच्या सूचना श्री. जयस्वाल यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

दुपारच्या सत्रात मंडळाच्या ग दक्षिण विभागातील खेड गल्ली प्रभादेवी येथील १० इमारती, बोटावाला चाळ, राजाभाऊ देसाई मार्गावरील समूह पुनर्विकास सुरू असलेल्या सात इमारतींची श्री. जयस्वाल यांनी पाहणी केली.

कादरी मेंशन, साखरबाई धानजी चाळ, प्रिन्सिपल टीपी प्लॉट, सिद्धी प्रभात जर्सी ए व बी, गणेश निवास या समूह पुनर्विकास सुरू असलेल्या इमारतींची देखील त्यांनी पाहणी केली. या इमारतींसंदर्भात तात्काळ बैठक आयोजित करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना श्री. जयस्वाल यांनी दिले. ग दक्षिण विभागातील इमारती पाहणी वेळी माजी आमदार श्री. सदा सरवणकर उपस्थित होते.

दुपारच्या सत्रात श्री. जयस्वाल यांनी म्हाडा मुंबई दुरुस्ती पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीतील पिरामल मिल संक्रमण शिबिराची पाहणी करत तेथील भाडेकरू/रहिवासी यांच्या समस्या जाणून घेतल्या.

भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांसाठी वेलिंग्टन व्ह्यू हे विश्रामगृह तयार करण्यात येत असून त्याचे काम लवकर पूर्ण करण्याचे निर्देश श्री. जयस्वाल यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

एम पी मिल कंपाऊंड येथे नोकरदार महिलांकरता उभारण्यात येणाऱ्या वसतिगृहाच्या ठिकाणी असलेल्या संक्रमण शिबिराच्या दोन इमारतींच्या पाडकामाचे निर्देश श्री. जयस्वाल यांनी दिले.

जुनी चिखलवाडी येथे भूसंपादित मालमत्तेवर सुरू असलेल्या संयुक्त भागीदारी पुनर्विकास प्रकल्पालाही श्री. जयस्वाल यांनी भेट दिली.

गोरेगावकर वाडी, कोळीवाडी या उपकरप्राप्त इमारतींचा विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अंतर्गत पुनर्विकासासाठी प्रस्ताव प्राप्त झाला असून त्याची छाननी लवकर पूर्ण करण्याचे निर्देश श्री. जयस्वाल यांनी संबंधितांना दिले.

गिरगाव येथील आयुर्विमा महामंडळाच्या मालकीच्या इमारतींनाही श्री. जयस्वाल यांनी भेट दिली. याप्रसंगी भाडेकरू/रहिवासी सह झालेल्या चर्चेत इमारतींच्या पुनर्विकासा करिता इच्छुक असल्याचे श्री. जयस्वाल यांना सांगितले.

या पाहणी दौऱ्यात मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. मिलिंद शंभरकर, सहमुख्य अधिकारी श्री. उमेश वाघ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनिल वानखडे आदी उपस्थित होते.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण

---

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

================================================================

Outward No. : 685/22 Dt. February 14, 2025

Press Release

**MHADA VP CEO, Mr. Sanjeev Jaiswal, IAS, conducts ground Inspection of MHADA cessed properties**

Mr. Jaiswal assesses progress of cessed and redeveloped buildings

Mumbai, February 14, 2025: MHADA Vice President and CEO, Mr. Sanjeev Jaiswal, IAS, conducted an extensive inspection of cessed and redeveloped buildings under the jurisdiction of the Mumbai Building Repairs and Reconstruction Board. The inspection began at 11:00 AM and concluded at 5:30 PM, covering various sites, including buildings acquired under Section 91(A), cluster redevelopment projects under Regulation 33(9), and ongoing redevelopment works.

Mr. Jaiswal first visited Jasoda Co-operative Housing Society, Swami Samarth, and RK Building in the G-North Ward. These buildings were acquired under Section 91(A). He interacted with tenants and residents to understand their concerns and directed officials to ensure that pending work at these buildings is completed at the earliest.

At Anandalaya, a cessed building where redevelopment work has been delayed, Mr. Jaiswal noted that the developer had been given a six-month extension under Section 91(A). However, since the work had not progressed, he instructed officials to take action against the developer.

Mr. Jaiswal then inspected twelve cessed and redeveloped buildings under Regulation 33(9), including Chhapra, Mohsin, Kulshree Sita Smriti, Ganesh, Saudamini, Megh, Varun, Rambhuvan, Aakanksha, Gurukrupa, Abdul Rehman, and Khandke. He directed officials to hold a meeting on cluster redevelopment and urged residents to actively participate to ensure smooth implementation of the projects.

During the visit, Mr. Jaiswal instructed officials to include private properties such as Baithi Chawl and Janardan Apartment on Shankar Ghanekar Marg in the cluster redevelopment scheme under Regulation 33(9).

In the G-South Ward, he inspected ten buildings in Khed Galli, Prabhadevi, Botawala Chawl, and seven buildings on Rajabhau Desai Marg undergoing cluster redevelopment.

He also reviewed the progress of redevelopment work at Kadri Mansion, Sakharbai Dhanji Chawl, Principal TP Plot, Siddhi Prabhat Jersey A & B, and Ganesh Nivas. He directed officials to hold an urgent meeting to resolve redevelopment issues. Former MLA Shri Sada Sarvankar was present during the visit.

Mr. Jaiswal later visited the Piramal Mill transit camp to inspect the site and interact with tenants. He reviewed the ongoing construction of Wellington View, a rest house for Indian Administrative Service officers, and directed officials to ensure its timely completion.
At MP Mill Compound, where a working women's hostel is proposed, he instructed officials to demolish two transit buildings currently occupying the site.

He also inspected the joint redevelopment project at Juni Chikhalwadi and reviewed redevelopment proposals for Goregaonkar Wadi and Koliwadi under Regulation 33(7). He directed officials to complete the review process at the earliest.

Mr. Jaiswal also visited LIC-owned buildings in Girgaon, where tenants expressed their willingness to participate in the redevelopment process.

Accompanying Mr. Jaiswal on the inspection were Mumbai Building Repairs and Reconstruction Board CO, Mr. Milind Shambharkar, Joint CO, Mr. Umesh Wagh, and Deputy CEO, Mr. Anil Wankhade, along with other senior officials.
###

Vaishali Gadpale
Chief Public Relations Officer, MHADA
--






श्री कृष्ण
जन्माष्टमी







